**CNR NO.MHLA090003412021**

निशानी क्र.५ खाली आदेश

१. वादींनी नि. ५ खाली अर्ज दाखल करुन एकतर्फी मनाई हुकूम मिळावा म्हणून विनंती केली आहे.

२. वादीच्या विधीनांनी असा युक्तिवाद केला की, वादीने वाद मिळकत रजिस्टर्ड खरेदीखत आधारे विकत घेतली आहे. सदरचे मिळकत विकत घेतल्यानंतर त्याचे नाव नमुना नंबर ८ ला मालकी व ताब्याच्या रकान्यामध्ये नोंदले आहे. वादी हा वाद मिळकतीचा मालक व कब्जेदार आहे, असे असताना प्रतिवादी हे वाद मिळकतीवर बेकायदेशीर प्रयत्नात आहेत त्याअनुशंगाने वादीने ग्रामविकास अधिकारी मादलापूरला तक्रारी अर्ज दिला होता. वादीने प्रतिवादीकडे अतिक्रमण करु नये अशी विनंती केली परंतू त्यांची अतिक्रमण करण्याची कृती चालूच आहे, असेच अतिक्रमण चालूच ठेवल्यास न भरुन निघणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीची सदरची अतिक्रमण करण्याची कृती थांबवण्यात यावी.

३. अर्ज वाचला. वादीने खरेदीखत, नमुना नंबर ८ अ व काही शपथपत्रे दाखल केले आहे. प्रथमदर्शनी असे दिसते की, या स्थितीला प्रतिवादीची अतिक्रमणाची कृती थांबवणे न्यायोच्चीत आहे. तसेच सदरचा अर्जाची सुनावणी कालावधी लागत असल्यामुळे वादीस या घडीला दिलासा देणे आवश्यक होईल. त्यामुळे खालील मनाई हुकूम पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादींनी वाद मिळकती अनुशंगाने कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळे दि. २०/०२/२०२१ पर्यंत निर्माण करु नये.

२. वादीने सदरचा आदेश प्रतिवादी याना कळवावा.

( आर. बी. राउत )

दि. ०६-०२-२०२१ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

 उदगीर.